# तरंग

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**तरंग : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २४०/-

# तरंग

# विलोकुनि करी वश

मंजिरी सप्रे आणि प्रभाकर भडभडे यांच्या विफल प्रेमाची ही करुणरम्य कथा आहे. पृथ्वीवर प्रेमप्रमत्त प्रेमिकांसाठी प्राजक्तांच्या प्रफुल्ल पुष्पांची शेज सिद्ध आहे आणि वरच्या नभांगणात नयनरम्य नगण्य नक्षत्रांची नक्षी रेखली आहे. एवढ्यात अकस्मात उल्कापात व्हावा आणि प्राजक्ताची शेज कोळपून जावी असा चमत्कार या कादंबरीच्या पानोपानी घडलेला दिसतो. कादंबरीची ही करुणरम्यता विलोभनीय वाटते.

'डोहात खडा टाकला म्हणजे पाण्यावर तरंग उठतात. काही वेळानं ते तरंग नाहीसे होतात. तरंग दिसेनासे होतात याचा अर्थ आपण असा करतो की, ते तरंग नाहीसे झाले. परंतु खरं पाहता ते विरून गेलेले नसतात. डोहानं ते आपल्या पोटात घेतलेले असतात आणि त्यामुळे तितक्या प्रमाणात डोह समृद्ध होत असतो. मानवी आयुष्याची तऱ्हादेखील या डोहासारखी आहे. सुखदु:खांचे तरंग त्यावर नित्य उठत असतात. सुखाप्रमाणेच दु:खदेखील माणूस पोटात घेऊन पचवीत असतो; आणि सुखाप्रमाणेच जे जे दु:ख माणसाच्या वाट्याला येतं त्या त्या दु:खानं त्याचं जीवन समृद्ध होत असतं. म्हणून माणसानं दु:खावर चिडू नये. आपल्या अंतर्यामाच्या समृद्धीसाठी दु:खाची सुद्धा आवश्यकता आहे. असं माणसानं मानावं.'

मानवी जीवनाच्या या तत्त्वज्ञानाचे 'तरंग' प्रस्तुत कादंबरीच्या विशालरम्य डोहात उठलेले दिसतील. प्रतिबिंब पद्धतीच्या एका नव्याच निवेदनशैलीमुळे वाचकांच्या मनावरही सुखदु:खांचे तरंग उठतात केव्हा आणि नाहीसे होतात केव्हा, हे समजत नाही. कोणत्याही ललित-कृतीतील व्यक्तिरेखांशी वाचक जेव्हा सर्वस्वी समरसून जातात तेव्हा ती ललित-कृती सर्वांशानं सर्वश्रेष्ठ मानावी लागते. 'तरंग' कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या व्यथेशी वाचकांची तादात्म्यता होते ती यामुळेच !

रसराज शृंगाराचा विलोभनीय विलास करण्याची शक्ती गुरुवर्य आप्पासाहेब फडके यांच्या लेखणीत निरंतरची विसावलेली आहे. ही शक्ती किमपि उणावलेली नाही. महाकवी भारवीची साक्ष काढून असंही म्हणता येईल की, मूर्तिमंत प्रतिभेनं विनटलेल्या त्यांच्या मयूरपंखी कलमानं विलासिनीची गती धारण केलेली आहे. जोपर्यंत त्यांच्या त्या शृंगाररसाभिज्ञ कलमाचे 'कटाक्ष' वाचकांवर पडत नाहीत तोपर्यंत वाचक स्थितप्रज्ञ राहू शकेल. हरिणशावकांच्या नेत्रांप्रमाणे त्यांचे 'कलमकटाक्ष' जोपर्यंत अंत:करणात घुसले नाहीत तोपर्यंतच पुराणशास्त्रस्मृतिजन्य विवेक वाचकाला सुचेल. अन्यथा वाचक आप्पासाहेबांच्या या 'कलमकटाक्षां'नी घायाळ झालाच म्हणून समजावं ! अनभिज्ञ लोकांना श्रीरुद्रभट्टांनी 'पापी' ही संज्ञा दिलेली आहे. तुकारामांच्या भाषेत असे अरसिक वाचक 'येर ते बापुडे काय रंक' असे असतात. अशा करंट्या वाचकांनी 'तरंग'च्या वाटेला जाऊ नये. कारण केवळ 'विलोकुनि करी वश' अशी आहे या 'तरंग' कादंबरीची शक्ती ! सुखदु:खाचे, हर्षखेदाचे तरंग मनावर उठल्यानंतर ते अंत:करणाच्या डोहात पचविण्याची आणि आपलं जीवन समृद्ध करण्याची शक्ती असेल तरच 'तरंग' ही प्रभावशाली कादंबरी वाचकांनी हाती घ्यावी. गुरुवर्यांच्या अशा या समर्थ ललितकृतीविषयी 'म्या पामरे' अधिक काय बोलावे ?

**–भा. द. खेर**

# १

आगगाडीच्या डब्याच्या खिडकीतून बाहेर डोकावणारी मंजिरी प्लॅटफॉर्मवरच्या गर्दीतून वाट काढीत येणारा प्रभाकर दिसतो का म्हणून बघत होती, आणि तो दिसत नव्हता म्हणून मनाशी आश्चर्य करीत होती, त्याच्यावर रागावत होती, गाडी सुटण्याच्या वेळेपर्यंत तरी हा येतो की नाही अशा शंकेनं रडवेली होत होती.

ती निघाली होती आपल्या गावी–आपल्या घरी जाण्यासाठी.

आम्रपाली हे तिचं गाव. कोल्हापूर शहरापासून बारा मैलांच्या अंतरावर असलेलं. निसर्गसौंदर्यानं नटलेलं. शांततेत पहुडलेलं. आपल्या गावाविषयी मंजिरीला मोठा अभिमान होता. या गावात बालपणाचा काळ तिनं सुखात घालविलेला होता. पुढं शाळेतील आणि कॉलेजातील शिक्षणासाठी ती दूर गेली होती तरी लहानमोठ्या सुटीत नेहमी आम्रपालीला परत आली होती. आणि तिथल्या मुक्कामात रमली होती. निसर्गरम्य अशा त्या स्थळाविषयी तिच्या मनात गाढ आकर्षण होतं.

मात्र आता ती आम्रपालीला निघाली होती ते केवळ या आकर्षणामुळे नव्हे. दुसऱ्याच एका कारणानं आणि हेतूनं ती जात होती...तिच्या आयुष्यात एक महत्त्वाची घटना घडू पाहात होती. प्रभाकराच्या प्रेमात ती पडली होती. त्याचंही आपल्यावर प्रेम बसलेलं आहे या विचारानं ती आनंदली होती. आपल्या वडिलांशी प्रभाकराचा परिचय व्हावा अशी तिची इच्छा होती. तिच्याबरोबर आम्रपालीला जाण्याचं प्रभाकरनं कबूल केलं होतं. तो येतो म्हणाला होता, याचा तिला फार हर्ष झाला

होता...पुण्याच्या स्टेशनवरून सुटणारी गाडी साधण्यासाठी ती आली होती ती त्या हर्षभरातच ! दोघांसाठी चांगल्या जागा तिला धरता आल्या होत्या तेव्हा ती अगदी खुषीत आली होती. आपला प्रवास सुखाचा होणार या कल्पनेनं तिच्या मनात आनंद दाटून आला होता.

परंतु तिचा तो आनंद प्रभाकरानं पार नासवून टाकला होता. गाडी सुटायला आता पाच मिनिटांचा देखील अवकाश उरला नव्हता, आणि अजून या गृहस्थाचा पत्ता नव्हता!...प्लॅटफॉर्मवरच्या गर्दीत मंजिरीचे डोळे प्रभाकराला शोधीत होते, आणि तिच्या मनात निराशेचे, नाराजीचे, प्रभाकरावरील रागाचे विचार येत होते... 'या प्रभाकराचं हे नेहमीचं ठरलेलं आहे!' 'यानं मन:स्ताप दिला नाही तर हा प्रभाकर कसला?' 'एक घास सुखाचा देतो, परंतु दहा घास दु:खाचे गिळावे लागतात याच्यामुळे!'

प्रभाकराचं प्रेम आपल्यावर बसलं आहे हे गेल्या किती तरी दिवसांपासून तिनं ओळखलं होतं. त्याच्या बोलण्यात, वागण्यात ते प्रेम परोपरींनी प्रगट होत होतं. ते बघून ती सुखावत होती...परंतु अनेक वेळा तो अशा काही चमत्कारिक रीतीनं वागत असे, बोलत असे की, त्याच्या प्रेमाविषयीच्या तिच्या खात्रीला धक्का बसत असे. त्याच्या बोलण्यात कठोरपणा तिला आढळत असे, वागण्यात बेपर्वाई दिसत असे. त्याच्या स्वभावातला चंचलपणा आणि बेजजबाबदारपणा पाहून तिचं मन साशंक होत असे...मग तिच्या मनात प्रश्न उभा राहात असे, या प्रभाकरावर मी प्रेम करते खरी, परंतु यात माझी चूक तर होत नाही? मी फसत तर नाही?...किती लोकांनी तरी तिला इशारा दिला होता की, प्रभाकर भडभडे चांगला नाही. किंवा जितका चांगला आहे, तितकाच वाईट आहे. त्याच्या नादी शहाण्या मुलीनं लागू नये हे बरं...अशा प्रकारचा इशारा तिला देणाऱ्या माणसांचं बोलणं ऐकलं की, ती त्यांच्यावर रागावत असे आणि त्यांना म्हणत असे, 'एखाद्या माणसाविषयी लोकप्रवाद निर्माण झाले की ते उगीचच पसरतात. खऱ्याखोट्याचा विचार कुणी करीत नाही. जे ऐकलं ते वाढवून दुसऱ्याला सांगण्यात प्रत्येकजण आनंद मानीत असतो. तुमच्यापेक्षा प्रभाकराला मी अधिक ओळखते. तो चांगला आहे.' परंतु तिला सावध करू पाहणाऱ्या लोकांच्या बोलण्यावर अशा प्रकारचं उत्तर देऊन वर वर ती जरी आपल्या प्रेमाच्या खंबीरपणाचा देखावा करीत असे, तरी तिच्या मनात आल्यावाचून राहात नसे की, हे लोक



आपल्याला जे सांगतात त्यात पुष्कळ तथ्यांश आहे....प्रभाकराचे अवगुण तिला स्वत:लाही दिसत नव्हते अशातली थोडीच गोष्ट होती? असे अनेक प्रसंग वरचेवर घडले होते की, जेव्हा प्रभाकराचा निष्ठुरपणा, स्वार्थीपणा, दुसऱ्याच्या भावनांविषयीची बेपर्वाई, चैनबाजी तिला दिसली होती. इतकंच नव्हे तर तो स्वभावानं चंगीभंगी आहे, उनाड आहे, एकनिष्ठेचा गुण त्याच्यात नाही, तो लंपट आहे, असं तिच्या मनात आल्यावाचून राहिलं नव्हतं...दर वेळेस तिला त्याचा राग आला होता आणि कितीकदा त्याचा राग येण्याऐवजी तिला स्वत:चाच राग आला होता. त्याचे दुर्गुण दिसत असूनही त्याच्यावरचं तिचं प्रेम कमी होत नव्हतं. तो तिला हवासा वाटत होता, याचा तिला राग येत असे. कितीकदा तरी त्याच्या वागण्यानं तिला इतका मन:स्ताप होत असे की, 'पुन्हा तुझं तोंड पाहणार नाही.' असं त्याला सांगावंसं तिला वाटत असे. परंतु त्याची भेट झाली की त्याच्यावरचा तिचा राग कोठल्या कोठे नाहीसा होत असे. त्याच्या तोंडचा प्रेमाचा एक शब्द ऐकला की, तिच्या मनातली सारी चीड विरघळून जात असे. पुन्हा तोंड न पाहण्याची भाषा तर तिच्या तोंडून बाहेर पडत नसेच, परंतु तसा विचार देखील तिच्या मनात शिल्लक राहात नसे...स्वत:च्या या दुबळेपणाची तिला चीड येत असे.

आता डब्याच्या खिडकीतून डोकावून पाहणाऱ्या मंजिरीला जेव्हा प्रभाकर दिसेना तेव्हाही ती जितकी त्याच्यावर रागावत होती, त्याहून अधिक स्वत:वर चिडत होती....तिच्या मनात येत होतं, या प्रेमाच्या पाशात काय म्हणून अडकले आहे मी? एकदा निश्चय करून हा पाश तोडता का येत नाही मला?...तो न आला तर काय बिघडलं मोठसं? मी एकटी जाईन घरी. आम्रपालीला माझे तात्या आहेत. माझं घर आहे. माझा आवडता नदीकाठ आहे. शंकराचं मंदिर आहे. जिथं घटकाभर पाण्यात पाय सोडून निवांत बसता येतं, सुखदु:खाबद्दलची मनाची धाव विसरता येते, अशी माझी लहानपणापासून आवडती नदीच्या डोहाची जागा आहे...जाईन मी एकटीच घरी आणि तिथली सारी सुखं घेईन. या प्रभाकरावाचून काय अडलंय माझं?..तो न आला तर न आला! त्याच्या न येण्याचे दु:ख कशाला करू मी? जाईन मी आम्रपालीला एकटीच!

परंतु प्रेमात सापडलेल्या मुलींच्या मनाची अवस्था कशी होते पाहा...प्रभाकरावाचून एकट्यानं घरी जाण्याचा विचार मंजिरी एका क्षणी करीत

होती, आणि दुसऱ्याच क्षणी प्रभाकर यायला हवा असं तिला वाटत होतं आणि अत्यंत उत्सुक नजरेनं ती प्लॅटफॉर्मच्या गर्दीत त्याची मूर्ती शोधत होती.

प्लॅटफॉर्मवरच्या बुकस्टॉलवर तो तिच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर तिनं आवंढा गिळला....तिला तो धड स्पष्टपणे दिसत नव्हता. दोन-तीन इसमांच्या आड असलेला दिसत होता. काही तरी वाचीत होता. तिच्या मनात आलं, आधी हा उशीरा आलेला, गाडी सुटायला झालेली, आणि हा रेल्वे-बुकस्टॉलवर थांबला आहे! बरं थांबला तर थांबला चटकन् काय हवं ते विकत घ्यावं, पैसे फेकावे आणि कोणत्या डब्यात मी दिसते याचा शोध करावा की नाही यानं! परंतु तसं केल्यावर हा प्रभाकर कसा म्हणता येईल...दहा सेकंद गेले. वीस गेले...मंजिरीला ते अर्ध्या प्रहरासारखे वाटले. अजून हा जागचा हालत नाही, माझ्याकडे येऊ लागत नाही, याच्या शहाणपणाला म्हणावं तरी काय, असं ती मनाशी पुटपुटली. रेल्वेच्या भल्या मोठ्या घड्याळाकडे तिनं नजर टाकली. गाडीची सुटण्याची वेळ उलटून एक मिनिट झालेलं तिला दिसलं. तिला आश्चर्य वाटलं. काही कारणानं गाडीला खोटी झाली असावी, कदाचित आणखीही होणार असावी, असा तर्क तिच्या मनात आला. तिला बरं वाटलं...परंतु तरी प्रभाकरानं बुकस्टॉलपासून अजून दूर होऊ नये आणि आपल्याकडे येऊ नये, याबद्दलचं आश्चर्य आणि राग तिच्या मनातून दूर झाला नाहीच.

तितक्यात ज्या इसमांच्या आड प्रभाकर तिला दिसत होता ते इसम दूर झाले.

आणि तिच्या लक्षात आलं की, ती ज्याला प्रभाकर समजत होती, तो प्रभाकर नव्हताच! दुसऱ्याच कुणाला तरी बघून तिला प्रभाकराचा भास झाला होता. तिच्या उत्सुक नजरेनं तिला फसवलं होतं.

निराशेची आणि रागाची लहर तिच्या अंत:करणात पुन्हा उठली...अजून कसा आला नाही हा? काय म्हणावं याला? अशा प्रश्नांचा मंत्र ती पुन्हा घोकू लागली.... 'यायला चुकू नकोस हं' असं तिनं त्याला इतक्यांदा बजावलं होतं की, शेवटी त्यानं काहीशा रागानं विचारलं होतं. 'अगं कितीदा सांगशील?' आणि त्याचा राग योग्य वाटल्यामुळे ती नरमाईनं म्हणाली होती, 'सॉरी. आता पुन्हा नाही सांगणार.'

नाताळची सुटी जवळ येत चालली होती. तेव्हा एके दिवशी ती त्याला म्हणाली होती, 'माझ्या मनात एक आयडिया आली आहे सांगू?'

तो हसून म्हणाला होता, 'तुझी आयडिया नेहमीच मौलिक असते. सांग.'



खरं म्हणजे ती 'आयडिया' मंजिरीला या बोलण्याच्या वेळेसच आली होती असं नव्हे. गेल्या कितीक दिवसांपासून ती तिच्या मनात होती. नाताळच्या सुटीत ती घरी जाणार होती. सुटीच्या अवधीत त्याच्या आणि तिच्या गाठीभेटी बंद होणार होत्या. त्याच्या सहवास सुखाला ती अंतरणार होती. वरचेवर तिच्या मनात आलं होतं की, सुटीत आम्रपालीला जाऊच नये; परंतु तिला समजत होतं की, सुटीत ती घरी येईल, राहील, अशी तिच्या वडिलांची अपेक्षा साहजिकच असणार. त्यांची निराशा होता कामा नये. एकीकडे तिचं मन घराकडे ओढ घेत होतं, आणि दुसरीकडे आठ दिवस प्रभाकराला आपण बघणारही नाही या कल्पनेनं ती व्याकूळ होत होती....आणि मग केव्हा तरी एकदम तिच्या मनानं कल्पना काढली होती की, प्रभाकराला म्हणावं, चल की माझ्याबरोबर! नाही तरी आता तिच्या आणि त्याच्या मैत्रीचं रूपांतर प्रेमात होऊन दोघांमधले संबंध इतके वाढले होते की, केव्हा तरी तिच्या वडिलांनी प्रभाकराला बघायला हवंच होतं. लवकर म्हणा, उशिरा म्हणा, ती आपल्या वडिलांना 'प्रभाकराशी लग्न करू का?' म्हणून विचारणार होती, आणि त्या प्रश्नाची योग्य पार्श्वभूमी तयार होण्याची आवश्यकता होती. माझ्याबरोबर आम्रपालीला चल असं प्रभाकरला म्हणायची ही 'आयडिया' बरेच दिवसांपासून तिच्या मनात घोळत राहिली होती.

परंतु आता प्रभाकराशी बोलताना ती 'आयडिया' एकदम सुचल्याचा अभिनय तिनं उत्तम प्रकारे केला आणि ती म्हणाली, 'मी म्हणते, असं केलं तर?'

तिचाच स्वर पुढे लांबविल्याप्रमाणे करून चेष्टेच्या चर्येनं तो म्हणाला,

'कसं केलं तर?'

'आम्रपालीला यायला आवडेल ना तुला? आपण दोघं मिळून जाऊ.'

असा प्रश्न करून ती त्याच्या उत्तराचा अदमास घेण्यासाठी नजरेत नजर गुंतवून पाहात राहिली होती.

प्रभाकर म्हणाला होता, 'आमच्या कंपनीत एक बेत चाललेला ऐकतो. मालकांबरोबर कलकत्त्याच्या सफरीवर जावं लागणार आहे मला.'

'ही सबब नको सांगूस. तुझ्या मनात माझ्याबरोबर यायचं आहे की नाही ते सांग. तू मालकांना म्हणू शकतील की, तुमच्या पार्टीत मला नाही सामील होता येणार...' त्याच्या मनातला विचाराचा अदमास घेतल्याप्रमाणे तिनं त्याच्याकडे बघितलं होतं